# दिंडोरी पंचायत समिती, दिंडोरी जिल्हा नाशिक या संस्थेचा
# सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल

जा.क्र.स्था/३/ब/जिप/पंस दिंडोरी/नाशिक/

उपमुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा,नाशिक
लेखाकोष भवन,तिसरा मजला,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
नाशिक
दिनांकः-

प्रेषक,
उपमुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, नाशिक

प्रति,
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक

दिंडोरी पंचायत समिती, दिंडोरी जिल्हा नाशिक या संस्थेचे सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण श्री. सु. ध. ठाकरे, प्रभारी जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक १६.८.२००८ ते २०.९.२००८ या कालावधीत पूर्ण केले असून लेखापरीक्षण अहवालावर चर्चा करुन पुनर्विलोकन व अंतिमीकरण श्री. व्ही. ए. कोते, उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक १३.१०.२००८ रोजी केले.

लेखापरीक्षीत आर्थिक वर्षामध्ये खालीलप्रमाणे पदाधिकारी व अधिकारी संस्थेचे कामकाज पहात होते.

**<u>सभापती</u>**

| | |
|---|---|
| श्री. नंदू रामचंद्र पवार | १.४.२००७ ते ३१.३.२००८ |

**<u>गटविकास अधिकारी</u>**

| | |
|---|---|
| श्री.बी.बी.बहिरम | १.४.२००७ ते ३१.३.२००८ |

## भाग पहिला
## (मागील लेखापरीक्षण )

मागील लेखापरीक्षण अहवालातील खालील नमूद परिच्छेद थकीत असून त्यांबाबत मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे स्वतंत्ररित्या पत्रव्यवहार सुरु आहे.

| अ. क्र. | वर्ष | परिच्छेद क्रमांक | एकुण परि. |
|---|---|---|---|
| १ | १९७९-८० | १३<br>पं.रा.स. लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.१३: डी.कन्स्ट्रक्शन यांना रु. ४,९०२/- जादा अदा(६.१७) | १ |
| २ | १९८०-८१ | ३,९<br>पं.रा.स लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परिच्छेद क्र.९: भजनी मंडळास साहित्य पुरविणे (६.१२७) | २ |
| ३ | १९८२-८३ | ६,७<br>पं.रा.स. लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परिच्छेद क्र.७: लोकवर्गणीचा अनियमित परतावा (६.२८) | २ |
| ४ | १९८४-८५ | ३ | १ |
| ५ | १९८५-८६ | ४ | १ |
| ६ | १९८६-८७-८८ | ३,९ | २ |
| ७ | १९८८-८९ | ३ | १ |
| ८ | १९८९-९० | ३,४<br>पं.रा.स. लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परिच्छेद क्र.३: मागासवर्गीय भजनी मंडळ साहित्य वाटप (६.११) | २ |
| ९ | १९९०-९१ | ४,६ | २ |
| १० | १९९३-९४ | ४ | १ |
| ११ | १९९४-९५ | ११(१),२१<br>पं.रा.स. लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परिच्छेद क्र.२१: प्रलंबित अनामत रक्कमेबाबत. | २ |
| १२ | १९९५-९६ | ५(१,२),७,९<br>पं.रा.स. लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परिच्छेद क्र.९: पंचायत समिती सेस फंडातुन २० टक्के रक्कमेतुन मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी लाऊंडस्पिकर संच वाटपावर ९५-९६ मध्ये केलेल्या खर्चाबाबत. (४.८१) | ३ |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | १९९६-९७ | ८,१०,११,१३,२० | ५ |
| १४ | १९९७-९८ | १३,१५(अ,ब),१९<br>पं.रा.स. लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.१३: अभिकरण निधी रोखवहीतील ताळमेळ पत्रकाबाबत (४.८७)(५)<br>परि.क्र.१५: मुदतबाहय धनादेश रद्य न केलेबाबत (४.९५(६) | ३ |
| १५ | १९९८-९९ | ४,५,७,८,२०,२७,२८,<br>पं.रा.स. लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.७: जिल्हा निधी रोखवहीतील ताळमेळ पत्रकाबाबत (४.१०६)<br>परि.क्र.८: अभिकरण निधी रोखवहीतील ताळमेळ पत्रकाबाबत(४.१०६)<br>परि.क्र.:२०:हातपंप विदयुतपंप वर्गणी थकबाकीबाबत (४.१११)<br>परि.क्र.२७: प्रलंबित अग्रीम रक्कमेबाबत (४.११२)<br>परिच्छेद क्र :२८: अपूर्ण बांधकामाबाबत (४.१०९) | ७ |
| १६ | १९९९-२००० | ६,८,१४,२२<br>पं.रा.स. लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.६: हातपंप विदयुतपंप वर्गणी थकबाकीबाबत(४.१०४(१७)<br>परि.क्र.८: सिर्मेंट गोण्यांची रक्कम वसुलीबाबत. ४.११(१४)<br>परि.क्र.:२२: प्रलंबित अग्रीम रक्कमेबाबत ४.१०५(११) | ४ |
| १७ | २०००-२००१ | ११,१४,२०,२१,२७<br>पं.रा.स. लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.२०:- जिल्हा निधीच्या सर्वसाधारण रोकडवहीत ताळमेळ न घेतलेबाबत. ४.१७९(१)<br>परि.क्र.२१:- अभिकरण निधीकडे सर्वसाधारण रोकडवहीतील ताळमेळ पत्रकाबाबत.(४.१७९(२)<br>परि.क्र.२७:- अपूर्ण विहिरीवरील खर्चाबाबत. (४.१८२)(१७) | ५ |
| १८ | २००१-२००२ | ४,५,६,१२<br>पंरास लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.४:- हातपंप/विदयुतपंप वर्गणी थकबाकी वसुलीबाबत२.२४९(७)<br>परि.क्र.५:अभिकरण निधी सर्वसाधारण रोकडवहीतील ताळमेळ पत्रकाबाबत ४.२४३(६)<br>परि.क्र.६: जिल्हानिधी सर्वसाधारण रोकडवहीत ताळमेळ न घेतलेबाबत ४.२४३(७)<br>परि.क्र.१२: अपूर्ण बांधकामाबाबत ४.२४७ (५) | ४ |

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | २००२-०३ | ७,८,९,२४,<br>पंरास लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.९:- जिल्हानिधी सर्वसाधारण रोकडवहीत ताळमेळ घेणेबाबत. (४.१९८(३) | ४ |
| २० | २००३-२००४ | ४,६,११,१२,१५,१६,१९,२०<br>पंरास लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.११:- थकीत अग्रीम रक्कमांबाबत. (४.२०१(३)<br>परि.क्र.२०:- शिल्लक गणवेशांबाबत. (तालुका मास्तर) (४.११) | ८ |
| २१ | २००४-२००५ | ४,५,७,८,९,१२,१५,१६<br>पंरास लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.७:- हातपंप विद्युतपंप वर्गणी थकबाकी वसुलीबाबत.(४.३३४(५)<br>परि.क्र.९:- अभिकरण निधी सर्वसाधारण रोकडवहीतील ताळमेळ न घेतलेबाबत. (४.३२१) | ८ |
| २२ | २००५-२००६ | ४,५,६,७,९,१०,१२,१३,१४,१५,१६,१८,१९,२०,२१,२२,२३,२४,२६<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.४ :- पंचायत समिती उपकरातून मौजे लोखंडेवाडी ता. दिंडोरी साठवण बंधारे दुरुस्तीसाठी केलेल्या खर्चाबाबत. (४.१५५)<br>परि.क्र.६ :- पंचायत समिती उपकरातून ५०% अनुदानावर खरेदी करण्यात आलेल्या प्लॅस्टीक क्रेटस् खरेदीबाबत. (४.२३१)<br>परि.क्र.९ :- पंचायत मिती सेसमधून खेरदी केलेली ताडपत्री व त्याचे वाटपाबाबत. (४.४०४)<br>परि.क्र.१२ :- अभिकरण निधीच्या सर्वसाधारण रोकडवहीचा ताळमेळ न घेतलेबाबत.(४.७२६(८))<br>परि.क्र.१३ :- जिल्हा निधीच्या सर्वसाधारण रोकडवहीचा ताळमेळ न घेतलेबाबत. (४.७२६(८)<br>परि.क्र.१४ :- असंवितरीत धनादेशाबाबत. (४.७३३(४)<br>परि.क्र.१५ :- थकित अग्रीम रक्कमांबाबत. (४.७३१(५)<br>परि.क्र.२० :- अपूर्ण जवाहर विहिरीच्या बांधकामाबाबत (४.७२८(२३) | १९ |
| २२ | **सन २००६ – २००७ चा लेखापरीक्षण अहवाल.** | | |
| परिच्छेद क्रमांक ३:- पंचायत समिती सेसचे अंदाजपत्रकाबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक ४:- पंचायत समिती आवारातील मोकळी जागा उपहारगृहासाठी भाडयाने देणेबाबत. (पंरास प्रस्तावित) | | | |
| परिच्छेद क्रमांक ५:- शासकिय निवासस्थानाचे सेवाशुल्क कमी वसुल केलेबाबत. | | | |

| |
|---|
| परिच्छेद क्रमांक ६:- बांधकाम उपविभाग, दिंडोरी यांचे कडील मालमत्ता नोंदवहीबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ७:- दिंडोरी पंचायत समिती आवारात रस्ता तयार करणे. |
| परिच्छेद क्रमांक ८:- पंचायत समिती सेस मधून महिलांना शेवया मशिन पुरविणे. |
| परिच्छेद क्रमांक ९:- कर्मचा-यांच्या मासिक देय वेतन व भत्यांचे प्रदान बँकेमार्फत करण्याच्या कार्यपध्दतीमध्ये विहीत नोंदी होत नसलेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १०:- अ) अभिकरण निधीच्या सर्वसाधारण रोकडवहीचा ताळमेळ न घेतलेबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक १०:- ब) जिल्हा निधीच्या सर्वसाधारण रोकडवहीचा ताळमेळ न घेतलेबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक ११:- जवाहर विहीरीबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक १२ :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापराबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १३ :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापराबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १४:- ग्रामसेवकांच्या दैनंदिन्या विलंबाने किंवा उशिराने सादर करण्याच्या कार्यपध्दतीबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १५:- अर्धसमास पत्राव्दारे विचारलेल्या माहितीबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १६:- अल्पबचत अनुदानाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १७:- कर्मचा-यांना दिलेल्या सण / धान्य अग्रीमाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १८:- थकित अग्रिम रक्कमेबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक १९:- अंशराशिकरणाची रक्कम कुटूंब निवृत्ती वेतनातून कपात केलेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २०:- हातपंप व विद्युतपंप वर्गणी थकबाकीबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक २१:- सभापती व उपसभापती यांची दैनंदिनी मंजूर नसतांना प्र.भ.देयकांचे प्रदान केलेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २२:- जलस्वराज्य विभागांतर्गत जिल्हा परिषद शाळा स्वच्छतागृह बांधणे. |
| परिच्छेद क्रमांक २३:- जामीन कदबे आणि नोंदवहीबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २४:- अनामत नोंदवहीबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २५:- अपूर्ण बांधकामाबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक २६:- वार्षिक लेखे |
| परिच्छेद क्रमांक २७:- लेख्यांची स्थिती |
| परिच्छेद क्रमांक २८:- आक्षेप विवरणपत्र |
| परिच्छेद क्रमांक २९:- अनुपालन व पोहोच. |

टिप :- उपरोक्त नमुद केलेल्या आक्षेपांचे संदर्भात त्या त्या वर्षाच्या पुढील अभिप्रायामध्ये नमुद केलेले आक्षेप क्रमांकच अंतिम समजणेत यावेत.

# भाग दुसरा
# (चालु लेखापरीक्षण)

---

**परिच्छेद क्रमांक ३ :- पंचायत समिती सेसचे अंदाजपत्रकाबाबत.**

पंचायत समिती, दिंडोरी सन २००७ – २००८ उपकराचे सुधारीत अंदाजपत्रक पंचायत समिती ठराव क्रमांक २९ दिनांक १७.१.२००८ ने मंजूर केले आहे. प्रत्येक शिर्षाखाली केलेल्या तरतुदीनिहाय कमी / अधिक खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

(आकडे रुपयात)

| अ.क्र | लेखाशिर्ष | तरतुद | प्रत्यक्ष खर्च | कमी खर्च | जादा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | कृषि | ५०,००० | ४९,६४४ | ३५६ | ० |
| २ | पशुसंवर्धन | २०,००० | १९,९९७ | ३ | ० |
| ३ | शिक्षण | ५,००० | ० | ५,००० | ० |
| ४ | आरोग्य | ५,००० | ० | ५,००० | ० |
| ५ | समाजकल्याण | २,६५,००० | २,३६,१६४ | २८,८३६ | ० |
| ६ | इमारत व दळणवळण | ४,५०,००० | १,६८,२४७ | २,८१,७५३ | ० |
| ७ | लघुपाटबंधारे | १०,००० | ० | १०,००० | ० |
| ८ | महिला बालकल्याण | ९५,००० | ८८,४९४ | ६,५०३ | ० |
| ९ | अल्पबचत | ५०,००० | ० | ५०,००० | ० |
| | एकुण | ९,५०,००० | ५,६२,५४६ | ३,८७,४५४ | ० |

सदरचे अंदाजपत्रक व खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) सन २००७ – २००८ चे अंदाजपत्रक पंचायत समितीने वाजवी नियोजनपूर्वक वस्तुस्थितीस धरुन केले नसल्याचे दिसून येते. आर्थिक वर्षात आरोग्य, शिक्षण, लघुपाटबंधारे, अल्पबचत या लेखाशिर्षावर कोणतीही रक्कम खर्च केलेली नाही.

२) सन २००७ – २००८ ची सुरुवातीची शिल्लक रक्कम रुपये ७,०९,३८४.४३ व आर्थिक वर्षावरील जमा रक्कम रुपये ३,२८,१८९/- अशी एकूण जमा रक्कम रुपये १०,३७,५७३.४३ उपलब्ध असतांना व अंदाजपत्रकात तरतूद रक्कम रुपये ९,५०,०००/- ची केलेली असतांना रक्कम रुपये ३,८७,४५४/- खर्च कमी केलेला आहे.

३) समाजकल्याण या लेखाशिर्षाखाली रक्कम रुपये २,६५,०००/- तरतूद करुनही खर्च रक्कम रुपये २,३६,१६४/- कमी खर्च रक्कम रुपये २८,८३६/- केल्याने काही मागासवर्गीय सदर

लाभापासून वंचित राहिलेले आहेत. केलेला खर्च पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकांत धरुन अनुशेष भरुन काढावा. तसेच झालेल्या कमी खर्चास पंचायत समिती सभेचे क्षमापन घ्यावे.

४) कमी केलेल्या खर्चाबाबत पंचायत समिती सभागृहाची मंजूरी घेऊन दाखवावी.

५) मा. जिल्हाधिकारी / तहसिलदार, दिंडोरी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून दिनांक ३१.३.२००८ अखेर पंचायत समितीचा किती उपकर वसूल झाला याचा तपशील पंचायत समितीस प्राप्त झाला नाही. तरी याबाबत त्वरीत ताळमेळ घेऊन उपकराच्या सर्व रक्कमा प्राप्त झाल्याचे प्रमाणित करुन अनुपालन दर्शवावे.

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ ( अ ) खालील अनियमितता.

(जे प्रदान वैधानिक तरतुदी विरुध्द करण्यात आले आहे, असे प्रदान.)

### परिच्छेद क्रमांक ४ :- पंचायत समिती सेस अंतर्गत ९०% अनुदानावर सौर कंदील पुरविणेबाबत.

पंचायत समिती दिंडोरीने सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षात पंचायत समिती सेस अंतर्गत ९० % अनुदानावर सौर कंदील पुरविणेसाठी खालीलप्रमाणे खर्च केला आहे.

| अ.क्र. | प्र.क्र. | दिनांक | रक्कम रु. | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३१.३.२००८ | २,३६,१६४ | “सनटेक” सोलर सिस्टीम, नाशिक यांचेकडून दरकरारानुसार ७४ नग रुपये ३,५४६/- दराने खरेदी केलेली आहेत. |
| | | **एकूण** | **२,३६,१६४** | |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) पंचायत समिती ठराव क्रमांक १५ दिनांक १७.८.२००७ अन्वये योजनेची निवड करण्यांत आलेली आहे. मात्र त्यामध्ये लाभार्थी यादी नमुद नाही. त्यामुळे लाभार्थी निवड कशाचे आधारे केली याची पडताळणी करता आलेली नाही. याबाबत स्पष्टीकरणासह लाभार्थी यादीस पंचायत समिती सभेची कार्योत्तर मान्यता घेऊन लेखापरीक्षणास अनुपालन दर्शवावे.

२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र. झेडपीए – २०००/प्र.क्र.४१/३३ दिनांक १७.१.२००१ नुसार सदरची योजना ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार राबविण्यात आलेली नाही.

३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ मधील नियम ८३(३) नुसार; पुरवठादाराकडून साहित्य प्राप्त झाल्यानंतर मालाची पडताळणी करुन मागणीनुसार व सुस्थितीत साहित्य प्राप्त झाल्याबाबतचे प्रमाणपत्र गटविकास अधिकारी यांनी दिलेले नाही. त्यामुळे योग्य दर्जाचे साहित्य प्राप्त झाल्याची खात्री लेखापरीक्षणास करता आलेली नाही.

४) लाभार्थी प्रस्तावांची छाननी केली असता अ.क्र. ५२,५३,५५,५६,५७,७० व ७१ या लाभार्थ्यांचे करारनामे घेण्यांत आलेले नाहीत. तसेच नमुना नंबर ३३ व पोहच पावतीवर स्वाक्षरी घेण्यांत आलेली नाही. त्यामुळे त्यांना योजनेचा लाभ दिलेला आहे किंवा कसे याबाबत खात्री झाली नाही, तशी खात्री पटवावी. अन्यथा उपरोक्त ७ लाभार्थ्यांची रक्कम रुपये २४,८२२/- वसूल करुन अनुपालन दर्शवावे.

५) मास्टर नोंदवहीत यापूर्वीच्या नोंदी घेण्यांत आलेल्या नसल्याने एकाच लाभार्थ्यांस दुबार लाभ देण्यांत आला किंवा कसे, याची खात्री करता आलेली नाही.

६) श्री. रघुनाथ बाळू गांगुर्डे व तुळशीराम विठोबा झिरवाळ यांचे अर्ज घेण्यांत आलेले नाहीत. तरी सुध्दा लाभ देण्यांत आलेला आहे. सदरची बाब नियमबाह्य आहे. तरी याबाबत संबंधितांची जबाबदारी निश्‍चित करुन रक्कम रुपये ७,०९२/- वसूल करुन अनुपालन दर्शवावे.

७) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र. मागास-१०८९/प्र.क्र.७३/३४/दिनांक २०.१०.१९९९ नुसार मागासवर्गीयांच्या कल्याणासाठीच्या योजनांतर्गत ३०% रक्कम महिलांसाठी खर्च करणे आवश्यक असतांना फक्त ४ महिलांना सदर योजनेचा लाभ दिलेला आहे. म्हणजेच फक्त ५% रक्कम मागासवर्गीय महिलांसाठी खर्च केलेली आहे. याबाबत शासनाचे क्षमापन घेऊन अनुपालन दाखवावे.

८) लाभार्थ्यांचे विनियोग दाखले लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत. तरी विनियोग दाखले उपलब्ध करुन लेखापरीक्षणास दाखवावे.

९) सदरचे सौर कंदील महाउर्जाकडील दरकरार क्रमांक आयएन/एसपीव्ही-५७/५८१८/०६ दिनांक १३.९.२००६ नुसार केलेल्या दर करारानुसार खरेदी करण्यांत आलेले आहेत. सदरच्या दरकरारातील अटी व शर्तीनुसार पुढील ५ वर्षासाठी सर्वकष देखभालीस पुरवठादार बांधिल रहावा यासाठी त्यांचेकडून करारनामा घेणे बंधनकारक असतांना असा करारनामा घेण्यांत आलेला नाही. त्यामुळे नादुरुस्त झाल्यास खर्च निष्फळ होण्याची शक्यता आहे.

तरी उपआक्षेप क्रमांक ७ व ९ यांबाबत शासनाचे क्षमापन घेऊन त्यांसह उर्वरित पुर्तता दर्शवावी. तोपर्यंत सदरची रक्कम रुपये २,०४,२५०/- लेखापरीक्षणास आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष<br>
पंचायत समिती सेस<br>
वसुलपात्र रक्कम रुपये ३१,९१४/-<br>
आक्षेपाधिन रक्कम रुपये २,०४,२५०/-

---

**परिच्छेद क्रमांक ५ :- पंचायत समिती सेस अंतर्गत ५०% अनुदानावर सौर कंदील पुरविणेबाबत.**

पंचायत समिती दिंडोरीने सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षात पंचायत समिती सेस अंतर्गत ५० % अनुदानावर सौर कंदील पुरविणेसाठी खालीलप्रमाणे खर्च केला आहे.

| अ.क्र. | प्र.क्र. | दिनांक | रक्कम रु. | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | ३ | ३१.३.२००८ | ४९,६४४ | ‘‘सनटेक’’ सोलर सिस्टीम, नाशिक यांचेकडून दरकरारानुसार २८ नग रुपये ३,५४६/- दराने खरेदी केलेली आहेत. |
| | | **एकूण** | **४९,६४४** | |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) पंचायत समिती ठराव क्रमांक ३९ दिनांक २२.२.२००८ अन्वये योजनेची निवड करण्यांत आलेली आहे. मात्र त्यामध्ये लाभार्थी यादी नमुद नाही. त्यामुळे लाभार्थी निवड कशाचे आधारे केली याची पडताळणी करता आलेली नाही. याबाबत स्पष्टीकरणासह लाभार्थी यादीस पंचायत समिती सभेची कार्योत्तर मान्यता घेऊन लेखापरीक्षणास अनुपालन दर्शवावे.

२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र. झेडपीए – २०००/प्र.क्र.४१/३३ दिनांक १७.१.२००१ नुसार सदरची योजना ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार राबविण्यात आलेली नाही.

३) मास्टर नोंदवहीत यापूर्वीच्या नोंदी घेण्यांत आलेल्या नसल्याने एकाच लाभार्थ्यास दुबार लाभ देण्यांत आला किंवा कसे, याची पडताळणी करता आलेली नाही.

४) सदरचे सौर कंदील महाउर्जाकडील दरकरार क्रमांक आयएन/एसपीव्ही-५७/५८१८/०६ दिनांक १३.९.२००६ नुसार केलेल्या दर करारानुसार खरेदी करण्यांत आलेले आहेत. सदरच्या दरकरारातील अटी व शर्तीनुसार पुढील ५ वर्षासाठी सर्वकष देखभालीस पुरवठादार बांधिल रहावा यासाठी त्यांचेकडून करारनामा घेणे बंधनकारक असतांना असा करारनामा घेण्यांत आलेला नाही. त्यामुळे नादुरुस्त झाल्यास खर्च निष्फळ होण्याची शक्यता आहे.

५) साहित्याचा दर्जा व गुणवत्तेबाबत पावतीवर प्रमाणपत्र नमुद करणंत आलेले नाही. त्यामुळे मागणीप्रमाणे साहित्य प्राप्त झाल्याबद्दल लेखापरीक्षणात पडताळणी करता आलेली नाही.

वरीलप्रमाणे आक्षेपांची पुर्तता होईपर्यंत रक्कम रुपये ४९,६४४/- आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
पंचायत समिती सेस
आक्षेपाधिन रक्कम रुपये ४९,६४४/-

---

**परिच्छेद क्रमांक ६ :- पंचायत समिती सेस अंतर्गत ९०% अनुदानावर गरीब व गरजू महिलांच्या स्वयंरोजगारासाठी शेवया मशिन पुरविणेबाबत.**

पंचायत समिती दिंडोरीने सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षात पंचायत समिती सेस अंतर्गत ९०% अनुदानावर गरीब व गरजू महिलांच्या स्वयंरोजगारासाठी शेवया मशिन पुरविणे खालीलप्रमाणे खर्च केला आहे.

| अ.क्र. | प्र.क्र. | दिनांक | रक्कम रु. | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | ४ | ३१.३.२००८ | ८८,४९४ | एम.एस.एस.आय.डी.सी. कडून, प्रति नग रुपये १४,७४९/- प्रमाणे ६ नग शेवया मशिन खरेदी केलेली आहेत. |
| | | **एकूण** | ८८,४९४ | |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) पंचायत समिती ठराव क्रमांक २९ दिनांक २५.१.२००८ अन्वये योजनेची निवड करण्यांत आलेली आहे. मात्र त्यामध्ये लाभार्थी यादी नमुद नाही. त्यामुळे लाभार्थी निवड कशाचे आधारे केली याची पडताळणी करता आलेली नाही. याबाबत स्पष्टीकरणासह लाभार्थी यादीस पंचायत समिती सभेची कार्योत्तर मान्यता घेऊन लेखापरीक्षणास अनुपालन दर्शवावे.

२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र. झेडपीए – २०००/प्र.क्र.४१/३३ दिनांक १७.१.२००१ नुसार सदरची योजना ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार राबविण्यात आलेली नाही.

३) मास्टर नोंदवहीत यापूर्वीच्या नोंदी घेण्यांत आलेल्या नसल्याने एकाच लाभार्थ्यास दुबार लाभ देण्यांत आला किंवा कसे, याची खात्री करता आलेली नाही.

वरीलप्रमाणे आक्षेपांची पुर्तता होईपर्यंत रक्कम रुपये ८८,४९४/- आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
पंचायत समिती सेस
आक्षेपाधिन रक्कम रुपये ८८,४९४/-

---

**<u>परिच्छेद क्रमांक ७ :- पंचायत समिती सेस अंतर्गत अपूर्ण बांधकामाबाबत.</u>**

पंचायत समिती, दिंडोरीचे सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षण केले असता पंचायत समिती सेस मधून इमारत व दळणवळण विभागासाठी खालीलप्रमाणे खर्च करण्यांत आलेला आहे.

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|
| ५ | ३१.३.२००८ | १,३३,४४१ | पंचायत समिती कार्यालयाचे वॉल कंपाऊंडचे बांधकाम करणे (प्रथम देयक बिल) |
| ६ | ३१.३.२००८ | ३४,८०६ | पंचायत समिती आवारातील स्वच्छतागृह दुरुस्ती करणे (प्रथम देयक बिल) |
| | **एकूण** | **१,६८,२४७** | |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र. झेडपीए – २०००/प्र.क्र.४१/३३ दिनांक १७.१.२००१ नुसार सदरची कामे त्याच आर्थिक वर्षात पूर्ण करणे आवश्यक असतांना दिनांक ३१.३.२००८ अखेरपावेतो अपूर्ण स्थितीत आहेत.

२) केवळ अनुदान खर्च करण्याच्या उद्देशाने सदरची कामे हाती घेतल्याचे दिसून येते. कार्यारंभ आदेश क्र. एसपीएनएडब्ल्यू/एडिएम/४६९ दिनांक २५.३.२००८ रोजी देऊन दिनांक ३१.३.२००८ रोजी कामाचे प्रथम धावते बिल प्रदान केलेले आहे. वास्तविक सिमेंट कॉक्रीटच्या बांधकामासाठी किमान २१ दिवस स्थिरीकरणासाठी पाणी मारणे आवश्यक ठरते. मात्र पंचायत समिती दिंडोरीने कामाचे मजबुतीकरण इत्यादी बाबी न तपासता अनुदान खर्च करण्यासाठी केवळ ५ दिवसांतच बिलाची रक्कम प्रदान केल्याचे स्पष्ट होते.

याबाबत बांधकामाबाबत गुणनियंत्रण विभागाचे प्रमाणपत्र सादर करुन पुर्तता दर्शवावी. तोपर्यंत रक्कम रुपये १,६८,२४७/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

लेखाशिर्ष<br>पंचायत समिती सेस<br>आक्षेपाधिन रक्कम रुपये १,६८,२४७/-

---

**परिच्छेद क्रमांक ८ :- पंचायत समिती आवारातील मोकळी जागा उपहारगृहासाठी भाडयाने देणेबाबत.**

पंचायत समिती, आवारातील मोकळया जागेचा वापर उपहारगृहासाठी भाडयाने देणेबाबतच्या नस्तीची पडताळणी केली असता जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक १७ दिनांक ३०.११.१९७२ नुसार श्री. बाळू छबुशेठ दंडगव्हाण (सोनार) यांना दिंडोरी रस्त्यालगत ३० × २० = ६०० चौ.फुट जागा (पंचायत समिती आवारातील) उपहारगृह चालवणेसाठी शर्ती / अटींवर ११ महिन्यांच्या कराराने दिलेली आहे. तेव्हापासून प्रत्येक ११ महिन्यांसाठी अथवा ३ वर्षासाठी हा करार नियमितपणे करण्यात येत आहे.

ह्या ठरावाचे अनुषंगाने जिल्हा परिषद, नाशिक यांचे पत्र क्र. जिपना/ इवद-१/अनु/१७४/०३ दिनांक २२.१०.२००३ नुसार दिनांक १.११.१९९९ ते ३०.६.२००३ पावेतो ३ वर्षापर्यंत ही जागा भाडेपट्टयाने (अट क्रमांक ४) दिलेली आहे. मात्र प्रत्यक्षात ३ वर्षाऐवजी सदर मुदतीचा कालावधी ७ महिन्यांनी जास्त दिलेला आहे.

ह्या मुदतीनंतर खालीलप्रमाणे वेळोवेळी मुदतवाढी दिलेल्या आहेत.

१) पुढील मुदतवाढ जिपना/बांख्रा/इवद-१/१७७/२००४ दिनांक १८.६.२००४ नुसार दिनांक १.७.२००३ ते ३१.५.२००४ पर्यंत दरमहा रुपये १४१/- प्रमाणे

२) त्यापुढील मुदतवाढ – पत्र क्र. २००४/२५.१०.२००४ नुसार दिनांक ३१.५.२००४ ते ३०.४.२००५ पर्यंत प्रतिमहा रुपये १४१/- प्रमाणे

३) त्यापुढील कालावधीसाठी दिनांक १.४.२००५ ते आजपर्यंत संबंधितांना मुदतवाढ मंजूर करण्यात आलेले नाही. तथापि मंजूरीसाठी पंचायत समितीचे पत्र ९७० दिनांक १७.११.२००६ नुसार जिल्हा परिषदेकडे प्रस्तावित केलेले आहे.

उपरोक्त नमुद तपशिलाचे अनुषंगाने खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) जिल्हा परिषद ठराव १७ दिनांक ३०.११.१९७२ नुसार उपहारगृह चालवणेसाठी मंजूरी दिल्यानंतर दिनांक १.११.१९७२ ते ३१.१०.१९९९ पर्यंत कशा पध्दतीने भाडे आकारणी केली ह्या संदर्भात नस्तीसोबत कागदपत्र उपलब्ध नसल्याने त्याची पडताळणी करता आली नाही. मुळात अशी जागा भाड्याने देण्याची आवश्यकता काय व असेलच तर पंचायत समितीचे हित विचारात घेऊन वेळोवेळी स्पर्धात्मक निविदा / दरपत्रके मागवून लिलाव पध्दतीने भाडे करार का करण्यात आले नाहीत, याचा बोध होत नाही.

२) उपरोक्त नमुद मुदतवाढ देतांना बांधकाम विभागाने दुय्यम निबंधक कार्यालय, दिंडोरी यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक मुल्यांकन-२००३/३२२ दिनांक ३.१.२००४ नुसार शिघ्र गणकानुसार प्रति ८५० चौ.मी. ह्या मुल्यांकनाप्रमाणे उपहारगृह भाड्याचा मुदतवाढीचा प्रस्ताव मंजूर केला आहे. मात्र दुय्यम निबंधक ही स्थावर मालमत्तेच्या खेरदी विधीसंबंधित प्राधिकारी असल्याने भाडे

निर्धारणासाठी आधारभूत प्रमाणपत्र देण्यास स्थानिक स्वराज्य संस्थेएवजी ते सक्षम आहेत काय ? याबाबत प्राधिकार दर्शवावा.

३) उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे नस्तीचे पडताळणी केली असता दिनांक १.५.२००५ नंतर लेखापरीक्षण मुदतीपर्यंत संबंधितांस मुदतवाढ ही मंजूर केलेली नाही. तरी त्यांचे कडून जुन्याच दराने भाडे वसूली नियमबाह्य होत आहे. आता यांबाबत १.५.२००५ ते २३.१०.२००७ पर्यंत किंवा प्रस्ताव मंजूरीच्या कार्यवाहीच्या दिनांकापर्यंत बाजारभावाप्रमाणे दर निश्चित करुन रक्कम वसूल करावी व पुढे लिलावाद्वारे जागा भाड्याने देण्याची कार्यवाही करुन जास्तीत जास्त रक्कम देणा-यास जागा दिल्याबाबत कार्यवाही केल्याचे लेखापरीक्षणांत कागदपत्रासह दाखवावे.

४) मुदतवाढ देतांना उपअभियंता, बांधकाम विभाग, दिंडोरी यांनी दिलेल्या प्रमाणपत्रांमध्ये दरमहा रुपये १,५५१/- नमुद केलेले असतांना प्रत्यक्षांत दरमहा रुपये १४१/- प्रमाणे वसूली होत आहे. तसेच या प्रमाणपत्राचा नमुना मुळतः भाडयाने घेतलेल्या माध्यमिक शाळांच्या इमारतींकरीता असतांना त्यात आवश्यक काही बदल न करता तो निष्काळजीपणाने व अयोग्य या प्रकरणी लागू केला आहे.

५) तसेच करारनाम्याच्या मुळ अटी शर्तीनुसार श्री. दंडगव्हाण यांनी त्या मोकळ्या जागेत कुठलेही पक्के अथवा तात्पुरते बांधकाम करणेस परवानगी नसतांना उपअभियंता यांनी दिलेल्या प्रमाणपत्रांमध्ये श्री. दंडगव्हाण यांनी तात्पुरते बांधकाम करणेस परवानगी नसतांना उपअभियंता यांनी तात्पुरते बांधकाम केल्याचे तपशिल नमुद आहेत. म्हणजेच अटी शर्तीचा स्पष्टपणे भंग झालेला असतांनाही प्रशासन काहीच कारवाई करत नाही व पंचायत समितीचे हीत दुर्लक्षून श्री. दंडगव्हाण यांचे हीत जोपासले जाते आहे, हे स्पष्ट होते. याबाबत जबाबदारी निश्चित करुन संबंधितांवर उचित प्रशासकीय कारवाई करावी.

६) जिल्हा परिषद, नाशिकच्या बांधकाम विभागाने उपरोक्त नमुद दिनांक १.११.१९९९ ते ३०.४.२००५ पावेतो वेळोवेळी मुदतवाढी देतांना लिलाव पध्दतीने अंमलबजावणी करुन बाजार भावाचे चौ. फुटाच्या दरापेक्षा जो जास्त बोली लावेल त्याला करारबध्द न करता नाममात्र दरमहा रुपये १४१/- प्रमाणे आकारणी केल्याने पंचातय समितीचे मोठे आर्थिक नुकसान झालेले आहे. याबाबत मागील लेखापरीक्षण अहवालात परिच्छेद क्रमांक ४ नोंदवूनही काही कार्यवाही केलेली दिसून येत नाही. ही बाब गंभीर स्वरुपाची आहे याबाबत जिल्हा परिषदेचे स्थायी समिती अथवा सर्वसाधारण सभेच्या निदर्शनास आणून त्यांचे अभिप्रायानुसार संबंधितांवर उचित प्रशासकीय कारवाई करावी.

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ ( ब ) खालील अनियमितता.

(कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे किंवा गैरवर्तणुकीमुळे झालेले नुकसान)

**परिच्छेद क्रमांक ९ :- शासकिय निवासस्थानाचे सेवाशुल्क कमी वसूल केलेबाबत.**

पंचायत समिती दिंडोरीचे सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षण करतांना निवासस्थान नोंदवही तपासली असता आदिवासी विभागासाठी शासन निर्णय आदिवासी विकास विभाग, आस्था-१०९३/प्र.क्र.२४५/९३/का.एम/मंत्रालय, मुंबई – ३२ दिनांक १९.१२.१९९३ अन्वये मोफत निवासस्थान देण्यांत येते. त्यांत फक्त सेवाशुल्क चौ. फुटाआधारे वसूल करणे आवश्यक आहे. मात्र सर्व निवासस्थान धारकांकडून दरमहा केवळ रुपये १५०/- वसूल केलेले आहे.

मागील सन २००५ – २००६ च्या अहवालातील परिच्छेद क्रमांक ५ मध्ये नमुद केलेप्रमाणे शासन निर्णय, वित्त विभाग क्र. घ.भा./२०००/प्र.क्र.९७/सेवा-५/मंत्रालय, मुंबई दिनांक १७.२.२००१ अन्वये सेवाशुल्काची कमी वसूल रक्कम रुपये ६०,०००/- तसेच खालीलप्रमाणे सन २००७ – २००८ ची कमी वसूल रक्कम रुपये ४,९५०/- असे एकूण रक्कम रुपये ६४,९५०/- वसूल करुन अनुपालन दाखवावे.

| अ. क्र. | निवासस्थान क्र. | क्षेत्रफळ चौ.फु. | वसूल करावयाचे सेवाशुल्क | महिना | वसूल करावयाची रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | १(गविअ) | १६१५ | १५० | ५ | ७५० |
| २ | ६ | १०५९ | १५० | १४ | २,१०० |
| ३ | ८ | १०५९ | १५० | १४ | २,१०० |
| | | | | **एकूण** | **४,९५०** |

उपरोक्त कमी वसूल केलेली सेवाशुल्काची रक्कम, ज्या अधिकारी / कर्मचा-यांस सदर निवासस्थान कोणत्या कालावधीत दिलेले आहे, त्यानुसार करावी व हयापुढे अशा प्रकारची कार्यवाही सुरु असलेबाबत खात्री पटवावी.

पंचायत समिती दिंडोरी
वसूलपात्र रक्कम रुपये ६४,९५०/-

---

**परिच्छेद क्रमांक १० :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापराबाबत.**

सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षणाचेवेळी पंचायत समिती दिंडोरी येथील प्राथमिक आरोगय केंद्र मोहाडी यांची वाहनलेख्यांची पडताळणी करण्यात आली. आर्थिक वर्षात विभागाचे वाहन एम. एच. १२ ए.एच.६१९५ कार्यक्षेत्राबाहेर फिरल्याच्या नोंदींचा तपशील

सोबतच्या परिशिष्ट क्र. १ मध्ये दिला आहे. वाहन वापरण्यापूर्वी सक्षम वरिष्ठ अधिका-यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही झालेली नाही.

शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्र. जेईपी/२४६९/१७७०३/डी-१/ दिनांक १४.११.१९६९ अन्वये वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर करण्यापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही झालेली नाही. तसेच शासन निर्णय ग्रा.वि.वि.क्र. जेईपी/१०/सीआर/५९/००/०५ दिनांक २४.४.२००० अन्वये पूर्वपरवानगी शिवाय त्यांचे वापरातील वाहन कार्यक्षेत्राबाहेर वापरल्यास कार्योत्तर मंजूरी अनुज्ञेय नाही.

शासन निर्णय वित्त विभाग क्र.प्रवास/१००५/प्रक्र३३/सेवा ५/दि.८.७.२००५ नुसार कार्यक्षेत्राबाहेरील प्रवासास एकूण किलोमीटर ७९३ ची रुपये ८/- प्रति कि.मी. प्रमाणे संबंधितांकडून रुपये ६,३४४/- वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

वसुलपात्र रक्कम रुपये ६,३४४/-

---

**परिच्छेद क्रमांक ११ :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापराबाबत.**

सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षणाचेवेळी पंचायत समिती दिंडोरी येथील वाहनलेख्यांची पडताळणी करण्यात आली. आर्थिक वर्षात विभागाचे वाहन एम. एच. १५ ए.ए. ५०७२ कार्यक्षेत्राबाहेर फिरल्याच्या नोंदींचा तपशील सोबतच्या परिशिष्ट क्र. "२ अ" मध्ये दिला आहे. वाहन वापरण्यापूर्वी सक्षम वरिष्ठ अधिका-यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही झालेली नाही.

शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्र. जेईपी/२४६९/१७७०३/डी-१/ दिनांक १४.११.१९६९ अन्वये वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर करण्यापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही झालेली नाही. तसेच शासन निर्णय ग्रा.वि.वि.क्र. जेईपी/१०/सीआर/५९/००/०५ दिनांक २४.४.२००० अन्वये पूर्वपरवानगी शिवाय त्यांचे वापरातील वाहन कार्यक्षेत्राबाहेर वापरल्यास कार्योत्तर मंजूरी अनुज्ञेय नाही.

शासन निर्णय वित्त विभाग क्र.प्रवास/१००५/प्रक्र३३/सेवा ५/दि.८.७.२००५ नुसार कार्यक्षेत्राबाहेरील प्रवासास एकूण किलोमीटर ३५९८ ची रुपये ८/- प्रति कि.मी. प्रमाणे संबंधितांकडून रुपये २८,७८४/- वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

वसुलपात्र रक्कम रुपये २८,७८४/-

---

**परिच्छेद क्रमांक १२ :- पशुवैद्यकीय केंद्राकडील वसूल फी भरणा न केलेबाबत.**

पंचायत समिती, दिंडोरीकडील पशुवैद्यकीय केंद्र, चौसाळे व वारे यांचेकडील रोकडवहीची तपासणी केली असता दोन्ही केंद्राची जानेवारी – २००८ ते मार्च – २००८ पर्यंतची

जमा रक्कम अनुक्रमे रुपये ८२/- व रुपये ७०४/- लेखापरीक्षण कालावधीपर्यंत भरणा केलेली नाही.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १३ अन्वये वसूल केलेली रक्कम दररोज जमा करणे अवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केलेली नाही. सदर रक्कम संबंधितांकडून वसूल करुन त्वरीत शासन सदरी भरणा करुन विलंबाबाबत संबंधितांवर उचित प्रशासकीय कार्यवाही करुन अनुपालन लेखापरीक्षणात दाखवावे.

वसुलपात्र रक्कम रुपये ७८६/-

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ ( क ) खालील अनियमितता.

(एखादया व्यक्तीस मिळालेली रक्कम लेख्यामध्ये दाखवीणे आवश्यक होते परंतु ती दाखविण्यात आली नाही अशी बाब.)

---

**परिच्छेद क्रमांक १३ :- थकित अग्रिम रक्कमेबाबत.**

या अहवालासोबत जोडण्यांत आलेल्या विवरणपत्र क्रमांक ३(अ) नुसार दिनांक ३१.३.२००८ अखेर रक्कम रुपये १५,११,५७८/- कार्यालयीन कर्मचारी / प्राथमिक शिक्षक यांचेकडे उत्सव, धान्य, प्रवास भत्ता, वेतन, पेट्रोल-डिझेल, पाणीपुरवठा इत्यादी प्रकारच्या अग्रीमाची रक्कम सन १९६९ – १९७० पासुन थकीत असल्याचे दिसून येते.

शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्र.लेपअ/१०९२/ प्र.क्र.१४६९ /३० दिनांक २६.२.१९९३ अन्वये दिलेल्या सुचनेनुसार गटविकास अधिकारी यांनी ठोस कार्यवाही करुन रक्कम रुपये १५,११,५७८/- वसुल करणेची उपाय योजना करावी आणि तसे अनुपालन लेखापरीक्षणात दाखवावे.

देण्यात आलेल्या अग्रिम रक्कमेची वसुली / समायोजन वेळीच होणे आवश्यक आहे. अग्रीम रक्कमांची वसुली वेळीच न झाल्यास जबाबदार असणारे अधिकारी / कर्मचारी यांचे विरुध्द उचित कारवाई करुन त्यांचेकडून ही रक्कम वसुल करावी.

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ ( ड ) खालील अनियमितता.

(उपरोक्त अ,ब,क,व्यतिरिक्त लेख्यामध्ये आढळुन आलेल्या इतर अनियमितता.)

**परिच्छेद क्रमांक १४ :- अ) अभिकरण निधीच्या सर्वसाधारण रोकडवहीचा ताळमेळ न घेतलेबाबत.**

अभिकरण योजना निधीच्या सर्वसाधारण रोखवहीतील दिनांक ३१.३.२००८ अखेरच्या शिल्लकेत खालीलप्रमाणे तफावत आहे.

रोखवहीप्रमाणे शिल्लक रक्कम रुपये ३६,४२४.५५
बँकेतील शिल्लक रक्कम रुपये ४६,७५,५८६.०२
तफावत रक्कम रुपये रुपये ४६,३९,१६१.४७

तफावतीचा मेळ घेणेबाबत सन १९९६-९७ पासुन मागील लेखापरीक्षण अहवालांत खालीलप्रमाणे आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत.

| वर्ष | परि.क्र. |
|---|---|
| १९९६-१९९७ | १२ |
| १९९७-१९९८ | १३ |
| १९९८-१९९९ | ८ |
| १९९९-२००० | १४ |
| २०००-२००१ | २१ |
| २००१-२००२ | ५ |
| २००२-२००३ | ८ |
| २००३-२००४ | १५ |
| २००४-२००५ | ९ |
| २००५-२००६ | १२ |
| २००६-२००७ | १०(अ) |

वरीलप्रमाणे आक्षेप नोंदऊनही तफावत शोधून योग्य त्या दुरुस्तीसह ताळमेळ घेण्यात आलेला नाही. याबाबत संबंधितांनी बँक ताळमेळाचे कामात टाळाटाळ केल्याचे दिसुन येते. तरी याबाबत जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ५७ अन्वये तफावतीचे परीपूर्ण निराकरण करुन काही गैरव्यवहार झाला नसल्याचे प्रमाणित करावे व अनुपालन दाखवावे.

**परिच्छेद क्रमांक १४ :- ब) जिल्हा निधीच्या सर्वसाधारण रोकडवहीचा ताळमेळ न घेतलेबाबत.**

जिल्हा निधीच्या सर्वसाधारण रोखवहीतील दिनांक ३१.३.२००८ अखेरच्या शिल्लकेत खालीलप्रमाणे तफावत आहे.

रोखवहीप्रमाणे शिल्लक रक्कम रुपये १३,९१,९७२/-
बँकेतील शिल्लक रक्कम रुपये ४३,६३,८५२/-
तफावत रक्कम रुपये २१,७१,८८०/-

तफावतीचा मेळ घेणेबाबत सन १९९७-९८ पासुन मागील लेखापरीक्षण अहवालात खालीलप्रमाणे आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत.

| वर्ष | परि.क्र. |
|---|---|
| १९९७-१९९८ | १८ |
| १९९८-१९९९ | ७ |
| १९९९-२००० | १३ |
| २०००-२००१ | २० |
| २००१-२००२ | ०६ |
| २००२-२००३ | ०९ |
| २००३-२००४ | १६ |
| २००४-२००५ | ०८ |
| २००५-२००६ | १३ |
| २००६-२००७ | १० ब |

वरील प्रमाणे आक्षेप नोंदऊनही तफावत शोधून योग्य त्या दुरुस्तीसह ताळमेळ घेण्यात आलेला नाही. याबाबत संबंधितांनी बँक ताळमेळाचे कामात टाळाटाळ केल्याचे दिसुन येते. तरी याबाबत जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ५७ अन्वये तफावतीचे परीपूर्ण निराकरण करुन कुठलाही गैरव्यवहार झाला नसल्याचे प्रमाणित करावे व अनुपालन दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १५ :- मुदतबाह्य धनादेशाद्वारे केलेल्या प्रदानाबाबत.**

पंचायत समिती दिंडोरीचे सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे मुदतबाह्य धनादेशाद्वारे रक्कमा प्रदान केलेल्या आहेत.

| निधी | धनादेश क्र. | दिनांक | रक्कम रुपये | धनादेश वटविल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| जिल्हा निधी | ६००९०७ | ३०.३.२००७ | ३०० | २०.११.२००७ |
| जिल्हा निधी | ६००९९० | ३०.३.२००७ | १,६०० | २०.११.२००७ |
| अभिकरण | ८१९८३२ | २१.३.२००७ | ४,००० | १८.१०.२००७ |

जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ मधील नियम ३१ नुसार धनादेश दिल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांपेक्षा जास्त काळासाठी प्रचलित राहणार नाही. या मुदतीनंतर अशा धनादेशवर बँकेने अदायगी देण्याचे नाकारावे. अथवा संबंधित मागणीदारास या मुदतीनंतर अशा धनादेशाची मुदत ज्याने धनादेशावर सही केली त्या अधिका-याच्या तारखेसहीत स्वाक्षरीने वाढवून घेता येईल. अशा बाबींची सामान्य चेकबुकमध्ये मुळ नोंदींच्या समोर व रोखवहीत नोंद घेण्यात येईल, अशा तरतुदी असतांना संबंधित कर्मचारी / अधिकारी यांनी यावर कोणतेही नियंत्रण ठेवलेले नाही. कोणत्याही प्रकारच्या नोंदी न करताच प्रदान केलेले आहे. ज्या धनादेशांची मुदत समाप्त होणार असेल अशा धनादेशांची यादी बँकेस देऊन प्रदाने थांबविण्याबाबत सूचना देणे आवश्यक असतांना अशा प्रकारची कार्यवाही झालेली नाही.

याबाबत आवश्यक त्या नोंदी घेण्यांत येऊन अनियमिततेस मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमापन घेऊन अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १६ :- मुदत संपलेले धनादेश रद्द न करणेबाबत.**

पंचायत समिती दिंडोरीचे सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे धनादेशांची १ वर्षाची मुदत संपलेली असतांना अद्यापपावेतो रद्द केलेले नाहीत, त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे –

| लेखाशिर्ष | धनादेश क्र. | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| अभिकरण योजना | ८१९८३२ | २१.३.२००७ | ३०,००० |
| जिल्हा निधी | ८६९४५६ | ३०.३.२००७ | ५०० |
| जिल्हा निधी | ८६९४५७ | ३०.३.२००७ | ५०० |
| जिल्हा निधी | ८६९४६४ | ३०.३.२००७ | ५०० |

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ मधील नियम ३१ नुसार धनादेश दिल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत अशा धनादेशाची मुदत वाढवून घेतली नाही तर असा धनादेश रद्द करण्यांत यावा अशी तरतूद आहे. परंतु पंचायत समिती दिंडोरीने वरील धनादेशांची एक वर्षाची मुदत संपलेली असतांनाही सदरचे धनादेश रद्द केलेले नाहीत. तरी सदरचे धनादेश त्वरीत रद्द करुन आवश्यक त्या नोंदी कॅशबुक, काऊंटर फाईल व अनुरुप जमा शिर्षाखाली घेऊन अनुपालन दाखवावे.

---

**<u>परिच्छेद क्रमांक १७ :- शिलकी रक्कमेची सुरक्षितता व पडताळणीबाबत.</u>**

जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ मधील नियम ४२ नुसार गटविकास अधिकारी यांनी प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या कार्यदिनी शिल्लकी रक्कमेची तपासणी करावी. तसेच तीन महिन्यातून एकदा कोणत्याही अनिश्चित दिवशी शिल्लक रक्कम तपासून ती रक्कम रोखवहीतील शिल्लकी रक्कमेशी जुळते याची खात्री करुन घ्यावी व तसे प्रमाणपत्र रोखवहीमध्ये नोंदविण्यात यावे. अशा तरतुदी असतांना अशा पध्दतीने कार्यपध्दती केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे शासकीय रोख व्यवहारांवर योग्य प्रकारचे नियंत्रण नाही, हे स्पष्ट होते. तरी याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे क्षमापन घेऊन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

---

**<u>परिच्छेद क्रमांक १९ :- हातपंप, विद्युतपंप वर्गणी थकबाकीबाबत.</u>**

पंचायत समिती, दिंडोरीच्या सन २००७ – २००८ साठीच्या हातपंप / विद्युतपंप देखभाल दुरुस्तीची वर्गणी नोंदवहीची पडताळणी केली असता या सोबतच्या परिशिष्ट क्र. “ ३ ” मध्ये दर्शविणेत आलेप्रमाणे दिनांक ३१.३.२००८ अखेर हातपंप देखभाल दुरुस्ती वर्गणी रक्कम रुपये २,२३,०३२/- व विद्युतपंपाची वर्गणी रक्कम रुपये २,६५,९६०/- अशी एकुण रक्कम रुपये ४,८८,९९२/- अदयापही ग्रामपंचायतीकडून वसुल करणे बाकी आहे.

याबाबत पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे आदेश क्रमांक भुजल १०९५/ प्र.क्र. २१७/४३ दिनांक १७.१.१९९६ अन्वये हातपंप / विद्युतपंपाची देखभाल व दुरुस्तीची प्रलंबित वर्गणी संबंधित ग्रामपंचायतीकडून रोख स्वरुपात अथवा देय अनुदानातुन सत्वर वसुल करावी व पुर्तता दाखवावी.

---

**परिच्छेद क्रमांक २० :- अनामत रक्कमा व्यपगत करणेबाबत.**

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम २१९ नुसार देय असलेल्या रक्कमेची तीन वर्षामध्ये मागणी न केल्यास त्या व्यपगत करणे आवश्यक आहे. पंचायत समितीने खालीलप्रमाणे तीन वर्षापेक्षा जादा कालावधीच्या अनामत रक्कमा कां व्यपगत केल्या नाहीत, याचे स्पष्टीकरण करणेत यावे.

सन २००४ – २००५ ची रक्कम रुपये ३९,६१४/- व्यपगत करुन त्या त्या महसूल लेखाशिर्षाखाली जमा करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

| अ.क्र. | सन | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | २००४ – २००५ | ३९,६१४ |
| २ | २००५ – २००६ | १,६२,२२३ |
| ३ | २००६ – २००७ | ४,४६,०९५ |
| ४ | २००७ – २००८ | १३,३९,९५८ |
| | **एकूण** | **१९,८७,८९०** |

---

**परिच्छेद क्रमांक २१ :- निवृत्ती वेतन प्रदान नोंदवही अपूर्ण असणेबाबत.**

जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम ३९ परिशिष्ट ४ मधील नियमान्वये पंचायत समितीत येणा-या प्रत्येक मागणी बिलाची व नोंदवहीची गट विकास अधिकारी याने प्रदान आदेशावर सही करण्यापूर्वी कनिष्ठ लेखा अधिका-यांकडून तपासणी होणे आवश्यक आहे.

पंचायत समिती दिंडोरी यांचेकडील गटशिक्षण अधिकारी यांचे कार्यालयांतील निवृत्ती वेतन देयके, निवृत्ती वेतन लेखापरीक्षण नोंदवही (ए.पि.पि.९) आणि उपदान व अंशराशीकरण नोंदवही (नमुना ए.पी.पी. १०) यांची तपासणी केली असता त्यामध्ये खालीलप्रमाणे अपूर्णता व तृटी आढळून आलेल्या आहेत.

१. नमुना ए.पी.पी. ९ मधील लेखा परीक्षण नोंदवहीत निवृत्ती वेतनाचा प्रकार, निवृत्ती वेतन सुरु झाल्याचा दिनांक, अशंराशीकरण केलेली रक्कम व प्रदानाचा दिनांक, मुळ निवृत्ती वेतन, अशंराशीकरणानंतरची रक्कम, महागाई भत्याचे दर, मासिक एकत्रित निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनाचे दर, निवृत्ती वेतनधारक मृत्यू पावल्यास मृत्यूची नोंद, वारसांची नोंद, प्रत्येक महिन्यांत किती निवृत्ती वेतन प्रदान केलेले याची नोंद व तपासणी केल्याबद्दल लेखाधिकारी यांची

स्वाक्षरी, जिवीत प्रमाणपत्राची नोंद, पुनर्विवाहाची / पुनर्नियुक्तीची नोंद, वयांची ६५ वर्षे पूर्ण किंवा मृत्यूनंतर ७ वर्षे यांपैकी जे अगोदर घडले असेल इत्यादी संबंधीच्या तारखा, मृत्यूनंतरच्या जादा प्रदान केलेल्या रक्कमा बँकेकडून परत मागवून शासन सदरी भरणा केल्याबद्दलच्या चलनासह नोंदी, अशंराशीकरणानंतर १५ वर्षांनी पुनर्स्थापना केल्याबाबतच्या नोंदी, चौथ्या, पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारीत निवृत्ती वेतन आदेशाप्रमाणे सुधारीत निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनाच्या नोंदी बँकेचे नाव व खाते क्रमांक इत्यादी नोंदी परिपूर्ण घेण्यांत आलेल्या नसल्यामुळे निवृत्ती वेतन धारकांस / कुटूंब निवृत्तीवेतनधारकांस योग्य प्रदान झाले किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणांत परिपूर्ण पडताळणी करता आलेली नाही.

२. बँकेमार्फत निवृत्तीवेतन घेणा-या निवृत्तीवेतनधारकास प्रत्येक वर्षी जीवीत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. जीवीत प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यास त्या निवृत्ती वेतन धारकास निवृत्ती वेतन प्रदान करण्याचे थांबवावे, असे नियम असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे तपासणी आढळून आलेले नाही.

३. नियम ८० अन्वये ज्या कुटूंब निवृत्तीवेतनधारकाचे निवृत्ती वेतन विवाहानंतर व पुनर्विवाहानंतर बंद होणार आहे. त्यांच्याकडून नमुना ए.पी.पी. १४ मध्ये दर सहामाहीस प्रतिज्ञापत्र मागविण्यांत येऊन ते डिसेंबर व जून मध्ये देय होणा-या निवृत्ती वेतन बिलासोबत जोडण्यांत यावे. असे प्रमाणपत्र देण्यात कसूर झालेल्या प्रकरणांचे सविस्तर विवरण जानेवारी व जूलै महिन्यांत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचकडे सादर करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

४. निवृत्ती वेतन आदेशांत निवृत्ती वेतन धारकांचे फोटो, स्वाक्षरीचे नमुने, सुधारीत निवृत्ती वेतनाचे आदेश इत्यादी प्रकारचे अत्यावश्यक कागदपत्रे नस्तीबद्ध केलेली नाहीत.

५. मासिक निवृत्ती वेतन बिल, निवृत्ती वेतन प्रदान आदेश व निवृत्त वेतन लेखा परीक्षा नोंदवहीतील नोंदी यामध्ये संदर्भिय नोंदवही क्रमांक, पृष्ठ क्रमांक यांची नोंद घेण्यात आलेली नाही. त्यामुळे संदर्भांकित लेखे तपासणीस लेखा परीक्षणात बराच कालावधी व श्रम व्यर्थ खर्च करावे लागत आहेत.

सदरचे नमुना ए.पी.पी. ९ व इतर अभिलेखे वेळीच पूर्ण न केल्याने योग्य प्रदाने झाल्याची पडताळणी लेखापरीक्षणांस करता आली नाही. या महत्त्वाच्या नोंदवह्या अपूर्ण ठेवणे ही बाब अतिशय गंभीर स्वरुपाची आहे. याबाबत संबंधित कर्मचारी व अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करावी. जादा प्रदान वसूलीबाबतचे आक्षेप स्वतंत्ररित्या नोंदविण्यात आलेले आहेत.

उपरोक्त आक्षेपांबाबत अंतर्गत लेखापरीक्षणाकडून उचित पडताळणी करुन त्यांचा अहवाल व त्यावरील कार्यवाही अहवालासह निवृत्ती वेतन लेखा परीक्षा नोंदवही व सर्व आदेश नोंदवहीसह अद्ययावत पुर्तता लेखापरीक्षणांस दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक २२ :- ग्रामसेवक / शिक्षक यांना पुरविण्यात आलेल्या निवासस्थानांचा वापर न करणेबाबत.**

बांधकाम उपविभाग, दिंडोरी यांचेकडील मालमत्ता नोंदवहीची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे ग्रामसेवक व शिक्षकांना पुरविण्यात आलेली निवासस्थाने विनावापर आहेत. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | गावाचे नाव | बांधकाम पूर्ण झाल्याचा दिनांक | बांधकामाचा उद्देश |
|---|---|---|---|
| १ | खेडगाव | २१.११.१९६४ | ग्रामसेवक निवासस्थान |
| २ | जानोरी | १७.०३.१९६६ | ग्रामसेवक निवासस्थान |
| ३ | महाजे | १७.०३.१९६६ | ग्रामसेवक निवासस्थान |
| ४ | मोहाडी | १७.०३.१९६६ | ग्रामसेवक निवासस्थान |
| ५ | उमराळे बु।। | २५.०३.१९६६ | ग्रामसेवक निवासस्थान |
| ६ | कोशिंबे | ३१.०३.१९८० | शिक्षक निवासस्थान |
| ७ | गांडोळे | १०.१२.१९७९ | शिक्षक निवासस्थान |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ मधील नियम ९७ व ९८ अन्वये दिंडोरी तालुक्यातील पंचायत समिती व जिल्हा परिषद मालकीच्या सर्व मालमत्ता / इमारती सुस्थितीत असलेबाबत प्रमाणित केलेले आहे. मात्र या निवासस्थानांचा संबंधित गावात नेमणूक झालेले ग्रामसेवक व शिक्षक निवासस्थान म्हणून वापर करीत नसून त्यांना घरभाडेभत्ता मासिक वेतनात प्रदान करण्यांत येत आहे.

२) निवासस्थाने वापरात आणणेबाबत सन २००६ – २००७ मध्ये सविस्तर आक्षेप नोंदविण्यात येऊनही त्याकडे दुर्लक्ष करण्यांत येत आहे.

याबाबत ज्या निवासस्थानांचा ज्या दिवसापासून वापर होत नाही व ज्या दिवसांपासून घरभाडे भत्ता व अनुज्ञप्ती शुल्क प्रदान करण्यांत आलेले आहे, त्याची परिगणना करुन रक्कम वसूल करण्यांत यावी. अथवा निवासस्थाने वापरण्यास योग्य नाहीत याबाबतचा अहवाल मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करुन पूर्वलक्षी प्रभावाने त्यांचे क्षमापन घेऊन तसे अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावे.

---

**<u>परिच्छेद क्रमांक २३ :- पूर्ण केलेल्या कामांची नोंदवही न ठेवणेबाबत.</u>**

जिल्हा परिषद व पंचायत समिती, लेखा संहिता १९६८ मधील नियम १९७ नुसार बांधकाम उपविभागाने नमुना नंबर ६९ मध्ये पूर्ण केलेल्या कामांची नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यामध्ये प्रत्येक कामाचे नाव, कामाचे ठिकाण, काम सुरु झाल्याची तारीख, काम पूर्ण झाल्याची तारीख, कामाचा एकूण खर्च, वार्षिक देखभालीचा अंदाजित खर्च व स्थावर मालमत्ता नोंदवहीतील संदर्भीय नोंदी इत्यादी तपशिल नोंदविण्यात यावा, अशी तरतुद आहे. मात्र उपविभागाने अशा प्रकारची नोंदवही अभिरक्षित केलेली नाही. त्यामुळे आतापर्यंत पंचायत समितीने किती कामे पूर्ण केलेली आहेत? कोणत्या कामावर दुबार खर्च करण्यांत आला आहे किंवा कसे? याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आलेली नाही.

तरी नमुना नंबर ६९ मध्ये सदरची नोंदवही तयार करुन त्यामध्ये अद्ययावत नोंदी घेऊन पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

---

**<u>परिच्छेद क्रमांक २४ :- करारपत्राची नोंदवही न ठेवणेबाबत.</u>**

जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ मधील नियम १४७ नुसार प्रत्येक मंजूर करारांची नमुना नंबर ४८ मध्ये नोंदवही परीरक्षीत करुन त्यामध्ये नोंद घेऊन प्रत्येक नोंदीखाली लेखाधिका-याने स्वाक्षरी करावी अशी तरतुद आहे. मात्र पंचायत समिती दिंडोरीने अशी नोंदवही परिरक्षित केलेली नाही. त्यामुळे पंचायत समितीने आजपावेतो कोणत्या कामासाठी कोणत्या मक्तेदाराबरोबर करार केलेले होते, कराराप्रमाणे विहित वेळेत काम पूर्ण झाले किंवा कसे इत्यादीबाबतची पडताळणी करता आलेली नाही.

तरी आजपावेतो केलेल्या कराराबाबतच्या नोंदी नमुना नंबर ४८ मध्ये घेऊन त्या नोंदीखाली सक्षम प्राधिका-याची स्वाक्षरी घेऊन अनुपालन दर्शवावे.

---

**<u>परिच्छेद क्रमांक २५ :- मजूर सहकारी संस्थांना काम देण्याबाबत.</u>**

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, परिपत्रक क्रमांक एलएबी-१०९०/सीआर-११/२ दिनांक ५.२.१९९१ नुसार कामांची गुणवत्ता राखण्यासाठी खालील प्रकारची कामे मजूर सहकारी संस्थांना देण्यात येऊ नयेत असे आदेशित केलेले आहे.

१) वाहतुकीची कामे
२) नलिका कुप खोदणे
३) आर.सी.सी. कामे
४) पेस्ट कंट्रोल अथवा जल प्रतिबंधक कामे

असे असतांना पंचायत समितीने सोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक " ६ " मध्ये नमुद केल्याप्रमाणे मजूर सहकारी संस्थांना कामे देऊन नियमबाह्यता केलेली आहे. त्यामुळे त्यांच्या कामाबाबत गुणनियंत्रण प्रमाणपत्रे घेऊन शासनाचे क्षमापनासह अनुपालन दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २६ :- जवाहर विहिरींच्या अपूर्ण बांधकामाबाबत.**

पंचायत समिती दिंडोरीचे सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षण केले असता सोबतच्या परिशिष्ट क्रमांक "४" मध्ये नमुद केल्याप्रमाणे जवाहर विहिरींची कामे अद्यापपावेतो अपूर्ण स्थितीत आहेत. सन २००४ – २००५ मध्ये एकूण ७८ विहिरींच्या कामांसाठी मंजूरी दिलेली होती, त्यांपैकी ६० विहिरींची कामे सन २००७ - २००८ मध्ये पूर्ण करण्यांत आलेली असून १० विहिरींची कामे अद्याप सुरु करण्यांत आलेली नाहीत. १ विहिरीचा प्रस्ताव अप्राप्त आहेव ७ विहिरींची कामे अद्यापपावेतो अपूर्ण स्थितीत आहेत. सदरच्या ७ विहिरींच्या अपूर्ण कामावर सन २००७ – २००८ अखेर रुपये २,१२,६८१/- एवढा खर्च करण्यांत आलेला आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. जाविका-१२९८/प्र.क्र.१०४/ रोहयो-१० दिनांक १.७.१९९८ मधील परिच्छेद क्रमांक १७ व १८ नुार विहिरींचे काम प्रशासकीय मान्यतेचया आदेशातील दिनांकापासून २ महिन्याचे आत सुरु करुन पुढील १२ महिन्याचे आत काम पूर्ण करावयाचे असतांना त्याप्रमाणे शासनाचे आदेशाचे पालन झालेले नाही. तरी याबाबत शासनाचे क्षमापन घेऊन अनुपालन दर्शवावे.

२) दिंडोरी उपविभागात एकूण ७ विहिरींची कामे अपूर्ण आहे. त्यामुळे अपूर्ण कामावर झालेला खर्च, सदरील कामे वेळीच पूर्ण झालेली नसल्यामुळे व्यर्थ जाण्याची शक्यता आहे. याबाबत अवर सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांचे पत्र क्रमांक ६५ दिनाक १३.९.२००१ अन्वये प्रत्येक लाभार्थ्यांकडून १८% दराने व्याज आकारणी करुन दंडनीय कारवाई करण्यांत यावी.

३) ज्या विहिरींची कामे अद्यापपावेतो सुरु करण्यांत आलेली नाहीत त्या विहीरींचे प्रस्ताव रद्द करण्याबाबतची कार्यवाही करुन भविष्यात अशा लाभार्थ्यांना अशाप्रकारचे लाभ मंजूर करण्यांत येऊ नयेत याबाबत उचित निर्णय घेऊन कार्यवाही दर्शवावी.

४) सन २००७ – २००८ मध्ये पंचायत समितीतील उपविभागास १७४ नविन विहिरींचा लक्षांक दिलेला असतांना त्याबाबत कोणतीही अंमलबजावणी केलेली नाही. याबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन शासनाचे क्षमापनासह अनुपालन दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २७ :- जवाहर विहिरी बांधकामातील अनियमितता**

पंचायत समिती दिंडोरीचे सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षण केले असता सोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक "५" मध्ये नमुद केल्याप्रमाणे जवाहर विहिरी बांधकामात खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

१) सन २००४ – २००५ मध्ये मंजूर केलेल्या ७८ विहिरींपैकी ६० विहिरींचे काम सन २००७ – २००८ मध्ये पूर्ण केलेले असून त्यावर एकूण रुपये ३६,००,०००/- खर्च करण्यांत आलेला आहे.

२) सदरच्या सर्व विहिरींसाठी एकाच प्रकारचे अंदाजपत्रक वापरण्यांत आलेले आहे. म्हणजेच ट्रायलपीट न घेता व प्रत्यक्ष भू - स्वरुपांचा अभ्यास न करताच एक समान अंदाजपत्रक तयार केल्याचे दिसून येते.

३) अंदाजपत्रकाप्रमाणे बांधकाम होणे अपेक्षित आहे व त्यानंतरच संबंधित अभियंत्याने / अधिका-याने काम पूर्णत्वाचा दाखला देणे आवश्यक आहे. तथापि सदरच्या विहिरींचे अत्यावश्यक भितींचे बांधकाम पूर्ण केलेले नसतांना, म्हणजे केवळ खोदाई पूर्ण झालेली असतांना पूर्णत्वाचा दाखला दिल्याचे मोजमाप पुस्तिकेवरुन दिसून येते. बांधकाम तांत्रिक दृष्ट्या पूर्ण केलेले नसतांना केवळ ३१ मार्च अखेर अनुदान खर्च करण्यासाठी पूर्णत्वाचा दाखला दिलेला आहे. ही कार्यवाही नियमबाह्य आहे.

४) मोजमाप पुस्तिकेत नोंदीच्या दिनांक नमुद नाहीत, तसेच उपअभियंता / गटविकास अधिकारी यांनी अशा कामांना भेट दिल्याबाबतच्या नोंदी ५% तपासणी केल्याबाबतच्या स्वाक्षरी मोजमाप पुस्तकात घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे विकास कामांवर योग्य नियंत्रण नसल्याचे स्पष्ट होते.

याबाबत विहिरींची बांधकामे पूर्ण करुन मोजमाप पुस्तिकेत नोंदवून कार्यकारी अभियंता, (रोजगार हमी योजना), विभागीय आयुक्तालय, नाशिक अथवा समकक्ष तांत्रिक अधिकारी यांचे क्षमापनासह अनुपालन सादर करावे

वरील पुर्तता होईपर्यंत खर्चाची रक्कम रुपये २६,००,०००/- तात्पुरती अमान्य करण्यात येत आहे.

---

**परिच्छेद क्रमांक २८ :- लघुपाटबंधारे उपविभाग, दिंडोरी यांचेकडील नोंदवही क्रमांक ३९ व ४१ अपूर्ण असणेबाबत.**

जिल्हा परिषद व पंचायत समिती, लेखा संहिता १९६८ मधील नियम क्रमांक ९७ अन्वये लघुपाटबधांरे विभागाने स्थावर मालमत्ता नोंदवही, नमुना क्रमांक ३९ व ४१ मध्ये

अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. तसेच नियम ९८ अन्वये सर्व स्थावर मालमत्तेची पडताळणी केल्याचे प्रमाणपत्र प्रत्येक वर्षी माहे जून मध्ये वरीष्ठ कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

पंचायत समिती, दिंडोरी यांचेकडील लघुपाटबंधारे उपविभागातील नोंदवह्या तपासल्या असता खालीलप्रमाणे अपूर्णता आढळून आलेल्या आहेत.

१) सदरच्या नोंदवहीतील गावतळे, पाझरतलाव यांचे संदर्भात संबंधित संपादित जमिनींचे ७/१२ उतारे प्राप्त करुन नोंदी घेण्यांत आलेल्या नाहीत.

२) सदरच्या जागेवर अतिक्रमणे झालेली नसल्याचे उपअभियंता, लघुपाटबंधारे उपविभाग, दिंडोरी यांनी प्रमाणित केल्याचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही.

३) सदरच्या कामावर नुतनीकरणासाठी किती वेळेस किती खर्च केलेला आहे. याबाबतच्या नोंदी नोंदवहीत घेण्यात आलेल्या नाहीत.

मागिल लेखापरीक्षण अहवालात आक्षेप नोंदवूनही सदरच्या नोंदवह्या अपूर्ण ठेवलेल्या आहेत. तरी नोंदवहीतील सर्व रकाने भरुन परिपूर्ण नोंदी व ७/१२ उता-यांसह विलंबाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमापन घेऊन अनुपालन सादर करावे.

---

## परिच्छेद क्रमांक २९ :- बांधकाम उपविभाग, दिंडोरी यांचेकडील मालमत्ता नोंदवही क्रमांक ३९,४० व ४१ अपूर्ण असणेबाबत.

जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम ९७ अन्वये बांधकाम विभागाने नमुना क्रमांक ३९, ४० व ४१ मध्ये स्थावर मालमत्तांच्या नोंदी अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. तसेच नियम ९८ अन्वये सर्व स्थावर मालमत्तेची पडताळणी केल्याचे प्रमाणपत्र प्रत्येक वर्षी माहे जून मध्ये वरीष्ठ कार्यालयाला सादर करणे, या प्रमाणपत्रात प्रत्यक्ष साठ्यात उपलब्ध नसलेल्या वस्तूंसंबंधी स्पष्टीकरण देणे, तसेच कोणतेही साहित्य समुचित मंजूरीशिवाय निर्लेखित करण्यांत आलेले नसल्याचे नमुद करणे आवश्यक आहे.

पंचायत समिती, दिंडोरी यांच्याकडील मालमत्ता नोंदवह्या तपासल्या असता त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) नोंदवही नमुना नंबर ३९ :- मालमत्ता नोंदवहीत बांधलेल्या इमारतींच्या नोंदी घेतल्या असून त्यातील रकाने क्रमांक ७ ते १३ अपूर्ण आहेत. इमारतींच्या नुतनीकरणासाठी केलेल्या खर्चाच्या नोंदी करण्यांत आलेल्या नाहीत. त्यामुळे सद्यस्थितीत सदरच्या इमारतींचे मुल्य किती? तसेच आजपावेतो किती वेळेस व किती खर्च दुरुस्तीवर करण्यांत आलेला आहे, नोंदीअभावी लेखापरीक्षणात पडताळणी करता आलेली नाही.

२) नोंदवही नमुना नंबर ४० :- सदरच्या नोंदवहीतील रस्त्याच्य नोंदी परिपूर्ण नाहीत तसेच नुतनीकरणावरील खर्च नोंदवहीत नमुद केलेला नसल्यामुळे दुबार खर्च झालेला आहे किंवा कसे, याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आलेली नाही.

<u>३) नोंदवही नमुना क्रमांक ४१</u> :- सदरच्या नोंदवहीतील रिकाम्या जागेच्या नोंदी घेतल्या असून काही रकाने अपूर्ण आहेत. सदरच्या रिकाम्या जागेवर अतिक्रमण झालेले नसल्याबाबतचे उपअभियंता यांनी प्रमाणित केलेले नाही. याबाबत ७/१२ उतारे प्राप्त करुन उपअभियंता यांचे प्रमाणपत्रासह अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

वरीलप्रमाणे नमुना क्रमांक ३९, ४० व ४१ नोंदवह्यांतील परीपूर्ण नोंदी घेण्यांत याव्यात व आवश्यक प्रमाणपत्रे व उतारे घेऊन लेखापरीक्षणास दाखवावे.

---

**<u>परिच्छेद क्रमांक ३० :- लेख्यांतील सर्वसाधारण अनियमितता</u>**

पंचायत समिती, दिंडोरीचे सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे सर्वसाधारण अनियमितता आढळून आल्या आहेत.

१) बिलांमध्ये मंजूर अनुदान, खर्च, शिल्लक अनुदान अशाप्रकारचा गोषवारा नमुद केलेला नाही. त्यामुळे प्रदानाचे वेळी अनुदान शिल्लक होते किंवा कसे याबाबत पडताळणी करता आलेली नाही.

२) बिलांसोबतचे उप्रपमाणके प्रदानानंतर 'पेड अँड कॅन्सल्ड्' केलेले नाहीत. त्यामुळे सदरची उपप्रमाणके दुबार उपयोगात आणण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३) बिलांतील खाडाखोडी व उपरीलेखन साक्षांकित केलेले नाही.

४) प्रवास खर्च बिलात परीपूर्ण तपशिल नमुद करण्यांत आलेला नाही. (उदा. मुळ वेतन नमुद न करणे यामुळे दैनिक भत्त्याचा दर योग्य नमुद आहे किंवा कसे याची पडताळणी करता आलेली नाही. तसेच प्रवासांचा निर्गमन व आगमनाची वेळ, कि.मी. वाहनाचा प्रकार, प्रवासाचे कारण इ. तपशिल परीपूर्ण नमुद केलेला नाही.)

५) वेतन प्रदान केल्याबद्दल संबंधितांची महसूल मुद्रांक लावून स्वाक्षरी घेण्यांत आलेली नाही. त्यामुळे संबंधितांना त्यांचे वेतन प्राप्त झाले किंवा कसे, याबाबत पडताळणी करता आलेली नाही.

६) वैद्यकीय बिलांसोबत सक्षम वैद्यकीय प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडण्यांत आलेले नाही. त्यामुळे सदरची बिले प्रतिपूर्तीस योग्य होती किंवा कसे, याबाबत पडताळणी करता आलेली नाही.

७) प्रलंबित बिलांची नोंदवही ठेऊन त्याप्रमाणे प्रलंबित बिलांचा तपशिल व अनुदान मागणीचा इत्यादींचा अहवाल जिल्हा परिषदेस नियमितपणे सादर करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत आलेली नाही. त्यामुळे मागील किती बिले प्रलंबित होती याबाबत नोंदवहीनुसार पडताळणी करता आलेली नाही.

८) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. संकिर्ण–१००५/५६६/प्र.क्र.३०/२००५ /१८ दिनांक १६.६.२००५ नुसार शासकिय पत्रे, आदेश व परिपत्रके निर्गमित करतांना स्वाक्षरीखाली कंसमध्ये नाव व पदनामाचा उल्लेख करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत

आलेली नाही. त्यामुळे प्राधिकृत अधिका-यांनीच स्वाक्षरी केलेली आहे किंवा कसे, याची पडताळणी करता आली नाही.

९) शासन परिपत्रक क्र. मबाख-१०९९/प्र.क्र.३६/९९/विनिमय दिनांक २८.१०.२००४ नुसार कोणत्याही मागणीचे दुबार प्रदान होऊ नये म्हणून प्रत्येक विभागाने दुबार देयक प्रतिबंधक नोंदवही परिरक्षित करणे आवश्यक आहे. तथापि अशाप्रकारची नोंदवही परिरक्षित केलेली नसल्यामुळे दुबार प्रदान झाले नसल्याबात लेखापरीक्षणात पडताळणी करता आलली नाही.

१० ) वेतन बिलात स्थायी / अस्थायी पदे, एकूण मंजूर पदे, भरलेली पदे, रिक्त पदे, वेतनश्रेणी, कर्तव्य कालावधी, रजा कालावधी इत्यादी तपशिल नमुद करणे आवश्यक आहे. वेतन वा रजावेतन थांबवले असेल तर ते का थांबवले याची करणे शेरा स्तंभात थोडक्यात नमुद करण्यांत यावीत. त्यानंतर तयार करण्यांत आलेल्या पुरक बिलाद्वारे अशा थांबविलेल्या वेतनाची रक्कम काढण्यांत आली तर मुळ वेतन बिलात तशी नोंद घेण्यांत यावी, त्यामागील हेतू असा की भविष्यात पुन्हा दुसरे बिल बनविले जाऊ नये, परंतु अशा प्रकारची कार्यवाही केल्याचे पडताळणीत आढळले नाही.

११) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ मधील नियम ८० नुसार प्रत्येक खाते प्रमुखाने व गटविकास अधिकारीने नमुना ३० मध्ये आकस्मिक खर्चाची नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तथापि अशा प्रकारची नोंदवही पडताळणीस उपलब्ध झालेली नाही.

१२) तीन महिन्यांपेक्षा जास्त कालावधीत न वटलेल्या धनादेशाच्या संदर्भात गटविकास अधिकारी यांनी नियंत्रण ठेवून प्रत्येक मासिक लेख्यांसोबत बँकेचे मेळपत्र जोडणे आवश्यक आहे. मात्र याकडे संबंधित कर्मचारी व अधिकारी यांनी पूर्णतः दुर्लक्ष केल्याचे दिसते. याबाबत गांभिर्याने नोंद घेणे व कार्यवाही करणे आवश्यक आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समिती, लेखासंहिता १९६८ मधील तरतुदींनुसार व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कामकाज करणे अपेक्षित असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. योग्य नियंत्रणाअभावी गैरव्यवहार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत योग्य ती कार्यवाही पूर्ण करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक ३१ :- वार्षिक लेखे**

या लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपांच्या पुर्ततेस अधीन राहुन पंचायत समितीचे सन २००७ – २००८ चे लेखे बरोबर आढळुन आले.

---

**परिच्छेद क्रमांक ३२ :- लेख्यांची स्थिती**

पंचायत समितीची लेखा स्थिती सर्वसाधारण बरी असल्याचे आढळुन आले. तथापि त्यामध्ये सुधारणा करण्यास वाव आहे. थकीत आक्षेपांचा निपटारा करणे आवश्यक आहे.

**परिच्छेद क्रमांक ३३ :- आक्षेप विवरणपत्र**

किरकोळ स्वरुपाच्या आक्षेपांची पुर्तता लेखापरीक्षण कालावधीत करुन घेण्यात आल्याने स्वतंत्र आक्षेप विवरणपत्र निर्गमित करणेत आलेले नाही.

**परिच्छेद क्रमांक ३४ :- अनुपालन व पोहोच.**

या लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपांचे अनुपालन मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० चे कलम १०(१) प्रमाणे हा लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाले पासुन चार महिन्यांच्या आत पंचायत समितीच्या ठरावाच्या प्रतीसह तीन प्रतीत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे स्वाक्षरीने या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे. तसेच हा अहवाल प्राप्त झाल्याचा दिनांक कळवुन पोहोच देण्यात यावी.

( वि.ए.कोते )
उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक

**प्रत सविनय सादर**

१) मा. सचिव, ग्राविकास विभाग महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ( पत्राने )
२) मा. महालेखापाल, बाहय लेखा परीक्षण विभाग, मुंबई
३) मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक
४) मा. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
५) मा. उपमुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, नाशिक विभाग नाशिक

**प्रत सस्नेह अग्रेषित :-**

१) म. उपमुख्य लेखा परीक्षक (पंचायत राज समिती), स्थानिक निधी लेखा, मुंबई
२) म. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, दिंडोरी

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक